पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 15/02/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर बाजार समिती भिवापुर येथे दिनांक 13/02/2020 चे 21.00 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 31/सीओ – 0817 क्रमांकाच्या ट्रकला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये एकुण 14 म्हशी कि. 1,40,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळून आला. आरोपी चालक नामे– शबीर दाऊत अली, वय 35 वर्ष, रा. यशोधरा नगर, नागपूर याच्या ताब्यातुन जनावर व वाहनासह एकुण किंमती 13,40,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रमोद गुलाब लांजेवार, वय 29 वर्ष, रा. पांजरेपार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 83/177, 130/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक फरकाडे 9822767833 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर